5928/2016
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन ३ रा मजला
८३, डां. अॅनी बेसंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८
17 NOV 2016

पहा -- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४८१ दिनांक १६.११.२०१६.
२) पत्र क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०४/का.१६, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १६.११.२०१६.

# परिपत्रक क्रमांक ४८२ दिनांक १६.११.२०१६

संदर्भित क्रमांक २ च्या शासकीय पत्रास अनुसरुन असे कळविण्यात येते कीं, संदर्भित क्र. १ चे परिपत्रकामध्ये दुरुस्ती करण्यात येवून, सदरचे परिपत्रक पुढील प्रमाणे वाचावे--

"महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेली सर्व देवस्थाने आणि धर्मादाय संस्था यांना अग्रेषित करण्यात येते कीं, त्यांच्याकडे दररोज दान/देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या चलनी नोटा आणि नाणी ही कोणत्याही परिस्थितीत त्याच दिवशी संबंधित बँकांमध्ये जमा करावीत.

राज्यातील सर्व देवस्थाने आणि धर्मादाय संस्था यांनी सदर आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील."

(श. भा. सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत --

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त
४. आस्थापना शाखा
५. लेखा शाखा

मभिसरनोबत/परिपत्रक/१६११२०१६

[illegible] . 5913/2016
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेसंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८

# परिपत्रक क्रमांक ४८७ दिनांक १६.११.२०१६

संदर्भ -- क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०४/का.१६, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक दिनांक १६.११.२०१६.

वर नमूद संदर्भित शासकीय परिपत्रकास अनुसरुन, महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या सर्व देवस्थाने, चर्च, मस्जिद, प्रार्थनास्थळे, इत्यादी, यांना अग्रेषित करण्यात येते कीं, त्यांनी दानपेटीत जमा झालेला निधी, दान/देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या चलनी नोटा आणि नाणी ही रोजच्या रोज बँकेत जमा करावीत आणि हा आदेश, स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन तसे आवाहन करावे. प्रसिध्दीसाठी येणारा खर्च सार्वजनिक प्रशासन निधीतून करावा.

(श. भा. सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत --

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहाय्यक धर्मादाय आयुक्त
४. आस्थापना शाखा
५. लेखा शाखा

मभिसरनोबत/परिपत्रक/१६११२०१६